| महाराष्ट्र पोलीस | पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

**प्रेस नोट** दिनांक :- ०३/०१/२०२४

## त्रंबकेश्वर शहरातील युवकाची गोळया झाडून हत्या करणारे मारेकरी गजाआड
## स्थानिक गुन्हे शाखा व त्रंबकेश्वर पोलीसांची कामगिरी

---

दि. २१/१२/२०२४ रोजी त्रंबकेश्वर शहरातील जव्हार रोड परिसरात भगवती नगर कमानी जवळ युवक नामे निलेश रामचंद्र परदेशी, रा. पाचआळी, गढई, त्रंबकेश्वर यास त्याचे मामा गोविंद दाभाडे यांनी जमीनीचे मालकी हक्काच्या वादाच्या कारणावरुन त्यांचे अज्ञात सहका-यांच्या मदतीने निलेश परदेशी याचेवर गोळीबार करुन त्यास जिवे ठार मारले म्हणुन त्रंबकेश्वर पोलीस ठाणे येथे गुरनं २२९/२०२४ भा.न्या.सं. कलम १०३(१), ३(५) सह भारतीय हत्यार कायदा कलम ३,५,२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, पेठ विभाग श्री. वासुदेव देसले यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेवुन घडले परिस्थितीची पाहणी करुन गुन्हयातील अज्ञात मारेक-यांच्या शोधार्थ स्थानिक गुन्हे शाखा व त्रंबकेश्वर पोलीसांना सुचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे व त्रंबकेश्वर पो.स्टे. चे पोलीस निरीक्षक श्री. बिपीनकुमार शेवाळे यांचे पथकांचा गुन्हा घडल्यापासून सतत त्रंबकेश्वर, नाशिक शहर तसेच पालघर जिल्हयातील खेडो-पाडयांमध्ये अज्ञात मारेक-यांचा शोध सुरु होता. तपासादरम्यान मयत व्यक्तीचा पुर्व-इतिहास व त्याचे सध्याचे दैनंदिन व्यवहारांबाबत गोपनीय माहिती घेण्यात आली, तसेच त्याचे नजीकचे मित्र, नातेवाईक व त्रंबकेश्वर शहरातील नागरीकांकडे याबाबत सखोल चौकशी करण्यात आली, त्यावरुन गोपनीय माहिती काढुन मयतास ठार करणारे गुन्हेगार हे मोखाडा व अंजनेरी शिवारातील असल्याची गुप्त बातमी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांना मिळाली होती. त्यानुसार स्थागुशाचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी अंजनेरी व नाशिक शहरातील अंबड परिसरातुन खालील संशयीतांना ताब्यात घेतले.

१) ज्ञानेश्वर सोमनाथ डगळे, वय २५, रा. अंजनेरी, कोळीवाडा, ता.त्रंबकेश्वर
२) सुरेंद्र अनंता जोगारे, वय २४, रा. आंब्याचा पाडा, पो. आसे, ता. मोखाडा, जि. पालघर
३) विठ्ठल सोनु बदादे, वय ३०, रा. तळयाचे वाडी, अंजनेरी शिवार, ता.त्रंबकेश्वर

ताब्यात घेतलेले वरील तीनही संशयीतांकडे तपासाचे कौशल्य वापरुन सखोल चौकशी केली असता, त्यांनी व त्याचे इतर साथीदार यांनी डिसेंबर महिन्यात २१ तारखेला सायंकाळचे सुमारास त्रंबकेश्वर ते जव्हार रोड परिसरात यातील मयत इसम नामे निलेश रामचंद्र परदेशी हा त्याचे मोटर सायकलवरुन जात असतांना भगवती नगर कमानीजवळ त्याचे अंगावर गोळया झाडून त्यास जिवे ठार मारले असल्याबाबत कबुली दिली आहे. यातील वरील तीनही आरोपींना वरील गुन्हयात अटक करण्यात आली असून, वरील घटनेच्या अनुषंगाने त्यांचेकडे सविस्तर चौकशी करण्यात येत असुन पुढील तपास चालु आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, पेठ विभाग श्री. वासुदेव देसले यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे, त्रंबकेश्वरचे पोलीस निरीक्षक श्री. बिपीनकुमार शेवाळे, सपोनि संदेश पवार, सपोउनि नवनाथ सानप, शिवाजी ठोंबरे, पोलीस अंमलदार संदिप नागपुरे, विनोद टिळे, मेघराज जाधव, सतिष जगताप, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, प्रविण गांगुर्डे, बापु पारखे, हेमंत गरुड, किशोर खराटे, नवनाथ वाघमोडे, रविंद्र गवळी, तानाजी झुरडे तसेच त्रंबकेश्वर पो.स्टे.चे पोलीस अंमलदार सचिन गवळी, श्रावण साळवे यांचे पथकाने वरील आरोपींना ताब्यात घेवुन सदर खुनाचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.